निर्णय क्र. मविनिआ/माअपील/०७/२०२५/०३८१ दिनांक: १९.०६.२०२५

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २४.०३.२०२५ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २१.०४.२०२५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०.०५.२०२५ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | १९.०६.२०२५ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०७/२०२५**

श्री. सुनील वाघ ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.०२.२०२५ व दिनांक २४.०२.२०२५ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २४.०३.२०२५ रोजी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक २४.०३.२०२५ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०४.२०२५ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक निरंक रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०५.२०२५ रोजी प्राप्त झाला).




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक २७.०५.२०२५ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०४.०६.२०२५ रोजी अर्जावर ऑनलाइन सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ०४.०६.२०२५ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी आणि जन माहिती अधिकारी सुनावणी साठी हजर झाले. श्री. सुनील वाघ यांनी सुनावणी दरम्यान माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या संबंधीची कागदपत्रांची मागणी केली.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्य शासनाच्या राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मंजूर केलेल्या वाहनांची माहिती.

२. आयोगाच्या वाहनांवर गतवर्षी इंधन, दुरुस्तीवर झालेल्या खर्चाची माहिती.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

१. लागू नाही.

२. माहिती अधिकारअंतर्गत अर्जदार त्यांच्या ज्या प्रश्नांची उत्तर मागत आहेत त्या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येमध्ये समाविष्ट नाहीत.

माहितीच्या व्याख्येमध्ये किती/का/केव्हा/कोणी/कोणता या प्रश्नांच्या उत्तरांचा, जे एखाद्या विशिष्ट गोष्टींच्या समर्थनाचे कारण असेल, त्याचा समावेश असू शकत नाही. एखादी गोष्ट किती/का/केव्हा/कोणी केली किंवा केली नाही याचे कारण जन माहिती अधिकारी नागरिकांना कळवू शकत नाही, जे माहिती अधिकाराच्या माहितीच्या व्याख्येत येत नाही.

वरील बाब लक्षात घेता, माहिती अधिकार अर्ज त्यानुसार निकालात काढण्यात येत आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

आपीलार्थी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कारणे खालील प्रमाणे:

१. जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन व वित्त) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांनी माहिती देताना दिशाभूल, खोटी, चुकीची व अपूर्ण स्वरूपाची माहिती दिली आहे. माहिती अधिकाराच्या मूळ अर्जात मागितलेल्या मुद्दा क्र. १ ते २ मधील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम (२)(च) नुसार देण्यात यावी तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (१)(त्र) नुसार जी माहिती संसदेला किंवा विधिमंडळाला नाकारता येत नाही ती माहिती कोणत्याही व्यक्तीला नाकारता येणार नाही.

२. जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन व वित्त) यांनी त्यांच्याशी संबंधित असलेले काम कर्तव्य पार पाडताना जाणूनबुजून किंवा हेतुपुस्सर दुर्लक्ष करून माहिती अधिकार अर्जावर विहित वेळेत कार्यवाही न केल्यामुळे महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम १०(१)(२)(३) प्रमाणे व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील तसेच वर्तणूक नियमानुसार संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.

३. मा. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २४/०२/२००९ च्या दिलेल्या निर्देशान्वये तसेच शासन परिपत्रक क्रमांक केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ मंत्रालय मुंबई दि. ३१ मार्च २००८ च्या दिलेल्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी याच्याविरुद्ध माहिती देण्यात कसूर व हलगर्जीपणा केला आहे त्याचप्रमाणे माहिती मिळविण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली आहे व जाणून बुजून चुकीची खोटी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने, न चुकता त्याबाबतची नोंद आदेशात नमूद करावी तसेच माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) नुसार दंड २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाई होण्यासाठी आपण मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे कारवाईच्या शिफारशीसह पाठवावी. माझ्या वरील मताशी आपीलीय प्राधिकारी या नात्याने आपण असहमत असाल व अशी नोंद करणे आपणास आवश्यक वाटत नसेल तर, जन माहिती अधिकारी यांनी केलेली वरील संपूर्ण कार्यवाही कशी योग्य आहे, त्याबाबत समर्थनीय कारणे देऊन, आपण आदेशात तसे कृपया नमूद करावे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्देः**

दिनांक ०४.०६.२०२५ रोजी ऑनलाइन झालेल्या सुनावणी दरम्यान अपीलकर्ता श्री. सुनील वाघ यांनी जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या संबंधीची कागदपत्रांची मागणी केली. तसेच माहिती अधिकार कायदा कलम १९(१) नुसार प्रथम आपीलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या वरच्या दर्जाचे अधिकारी

असले पाहिजेत परंतु प्रथम आपीलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी हे समान पदावर आहेत असा आक्षेप नोंदविला आणि सुनावणी दरम्यान अपीलमध्ये मागितलेल्या महितीबाबत चर्चा करण्यास नकार असल्याबबत कळविले.

अपीलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान नोंदविलेल्या आक्षेपाबाबत असे कळविण्यात येत आहे की आयोगाच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रथम आपीलीय अधिकारी यांची नेमणूक करण्याचे अधिकार हे प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या अधिकारक्षेत्रा बाहेरील आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांचा आक्षेप आयोगतील विभाग प्रमुख यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. परंतु, माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(६) नुसार अपील विहित वेळेत निकाली काढणे क्रमप्राप्त असल्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

अपीलकर्ता यांनी अपील दाखल करण्याच्या मुद्यांची कारणमीमांसा केल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.०३.२०२५ रोजीच्या अर्जावर दिनांक २१.०४.२०२५ रोजी विहित वेळेत उत्तर दिलेले आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्य शासनाच्या राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मंजूर केलेल्या वाहनांची माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी तोंडी स्वरूपात दिलेल्या माहिती नुसार असे निदर्शनास आले की, राज्य शासनाच्या राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मंजूर केलेल्या शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरण हे शासकीय वाहन खरेदी करण्यासाठी वापरत येणारे धोरण आहे. आयोगाच्या कार्यालयात शासकीय कामाकरिता वापरत येत असलेली वाहने ही खरेदी करण्यात आलेली नसून ती दीर्घकालीन भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे खरेदी करण्यासाठी वापरण्यात येणारे धोरण हे वाहन दीर्घकालीन भाडेतत्वावर घेण्यासाठी लागू करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

तसेच अपीलकर्ता यांनी आयोगाच्या वाहनांवर गतवर्षी इंधन, दुरुस्तीवर झालेल्या खर्चाची माहितीबाबत जन माहिती अधिकारी कडून तोंडी स्वरूपात सादर केलेल्या माहिती नुसार असे निदर्शनास आले की आयोगाच्या कार्यालयात शासकीय कामाकरिता वापरत येत असलेली वाहने दीर्घकालीन भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहेत. सदर कंत्राटमध्ये वाहनांची नियमित देखभालीची रक्कम देखील अंतर्भूत आहे. शिवाय, आयोगाच्या कार्यालयाकडून वाहनांवर नियमित देखभाल/दुरुस्ती करण्यात येत नसून ती कंत्राटदाराकडून करण्यात येते. त्यामुळे आयोगाच्या वाहनांवर गतवर्षी इंधन आणि दुरुस्तीवर झालेल्या खर्चाची नेमकी माहिती जन माहिती अधिकारी उपलब्ध करून

देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>**निर्णय**</u>

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(अभिजीत वि. चाटुफळे)
**प्रथम आपीलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन व वित्त)**

प्रती,
श्री. सुनील वाघ
रूम नं. २, इमारत क्र. १०/बी,
शरद को. ऑ. सोसायटी,
कामगार नगर, कुर्ला (पूर्व),
मुंबई – ४०००२४.

(अभिजीत वि. चाटुफळे)
**प्रथम आपीलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन व वित्त)**

प्रत,
जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई